काव्य - २४०६

२४०६

"वाचे बरवे कवित्व कवित्वी रसिकत्व" –ज्ञानेश्वरी

कवि मंडळ,

नासिक.

प्रणीत——

प्रातिनिधिक कविता संग्रह.

पुष्प ५ वे

# काव्य – कलश

प्रस्तावना —

– कविवर्य योगेश्वर अभ्यंकर

• प्रकाशक
ग. म. अंधूटकर
ज्ञान वर्धिनी, तिवंधा,
कवि मंडळ, नासिक–१.

• मुखपृष्ठ सजावट
किशोर बाटविया

• मुद्रक
विजयकुमार त्र्यंबक दाते
प्रविन प्रिंटिंग प्रेस,
१६०१, नगरकर लेन, नासिक–१.

• सर्व हक्क
कवि मंडळ, नासिक यांचे स्वाधीन

• पृष्ठ संख्या अडतीस

• प्रथमावृत्ती
मार्च १९७६

• किंमत तीन रुपये पन्नास पैसे

# शुभेच्छा !

नासिकचे कवि मंडळ 'कलश' प्रकाशित करुन आपला अकरावा वाढदिवस साजरा करीत आहे. काव्य दर्शन, प्रकाशन, चर्चा इ. कार्यक्रमांच्या द्वारा मंडळाने हौशी काव्याराधनेला बरेच प्रोत्साहन दिले आहे.

आराधनेपासून साधनेपर्यन्तचा प्रवासही मंडळ पुढील काळात करील अशी अपेक्षा आहे. वाढदिवसानिमित्त मंडळाला आणि या प्रकाशनाला माझ्या शुभेच्छा.

**- वि. वा. शिरवाडकर**
( कुसुमाग्रज )

# अन्तोर्मी

प्रिय रसिका –

कवि मंडळाच्या अकराव्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाचा हा अनोखा पांचवा काव्य कलश तुझ्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे.

कल्पनेच्या आकाशातून सर सर धावत येणाऱ्या शब्दांच्या ओळीने हा कलश भरुन देतांना एक ऊर्मी उफाळून आली आहे. "रसिका ! तुला सांगतांना इतकेच म्हणायचे आहे कीं, समुद्रमंथनातून चांगले वा वाईट निघाले तसे या कलशात असेलही, पण जिद्द फक्त घुसळण्याची होती तशी ही जिद्द कलश भरुन देण्याची आहे."

कलश याचा भावपूर्ण अर्थ असाच असावा जसे घरातून बाहेर निघतांना समोरून सुहासिन डोक्यावर घडा भरुन येत असतांना दिसली कीं, शुभ शकून समजला जातो.

मग लक्ष्मी म्हणजे पैशाच्या रूपाने त्या घड्यात पैसे टाकायचे–

असाच कांहीं हा काव्य कलशाचा शुभ शकून याच अर्थी की, यातले कवि नवे व अज्ञात असले तरी त्यांनी कलश भरुन देण्यास सुरवात केली आहे व रसिका ! हा कलश तुझ्यापुढे सादर केला आहे.

या कलशाला डोक्यावर घेवून नाचणे किंवा तो टिकास्त्राने रीता करणें हे सर्वस्वी तुझ्या हाती आहे.

या कलशाला माननीय तात्यासाहेब (कवि कुसुमाग्रज) यांचे आशिर्वाद मिळणार ही बाब निर्विवाद होती. आम्ही मागावे व त्यांनी द्यावे असा त्यांचा कवि मंडळावरती लोभ आहे. या कलशाला सोनेरीकडा त्यांच्या आशीर्वादाचीच आहे.

कलश तर भरला मोठ्या उमेदीने पण तो भरतांना शिंपले कोणती, मोती कोणते किंवा कुठल्या कल्पनांच्या शिंपल्यांत सुंदर शब्दांचे मोतीं झाकले आहेत हे मान्यवर भक्तिगीतांचे कवि श्री. योगेश्वर

अभ्यंकर यांनी प्रस्तावनेत विषद केले आहेच. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ नेहमी होतोच परन्तु प्रकृती अस्वास्थतेतूनही त्यांनी या कलशाचे नीरक्षिर विवेचन दिले आहे, कवि मंडळ त्यांचे सदैव ऋणी राहील.

अकराव्या वर्धापनापर्यन्त मंडळाने खूप स्तुल्य उपक्रम केलेत. या मंडळात भावनेला पंख फुटेपर्यन्त खूप कविंनी मंडळाच्या शब्द कुशीची ऊब घेतली, पंख फुटल्यावर पांखरू स्वैर होते, असे अनेक कवि काव्य आकाशात आपआपल्या प्रतिभेने गवसनी घेत आहेत मंडळाला त्यांचा अभिमान आणि कौतुकही वाटते.

रसिका ! मंडळाने आतापर्यन्त तुझ्यापुढे "काफीला" व "कवितरंग" हे दोन कवि मंडळाचे प्रातिनिधीक काव्य संग्रह सादर केले आहेत, आणि "संगीनीच्या छायेत" व "हे बंध रेशमाचे" ह्या दोन काव्यसंग्रहचे प्रकाशनास मंडाळाने उत्तजनदिले आहे.

कवि मंडळाचे संस्थापक श्री. ग म. अंधृटकर यांचा या कामी तर सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या प्रोत्साहनानेच हा कलश भरून आला.

प्र वि न प्रेसचे चालक श्री. विजयकुमार दाते व त्यांचे सहकारी श्री. रामदास कवरं यांचे तर आभार मानावे तेवढे थोडेच. कारण अल्पवेळेत त्यांनी सुबक सुंदर काव्य कलश आमच्या हाती छापून दिला.

काव्य कलशासाठी ज्या कविंकवियत्रिंनी आपले शद्बार्ध्य दिले त्यांचे तर आभार मानायला हवेच त्यांनी शद्ब व प्रसिद्धीचे मूल्य देऊन मंडळाला उपकृत केले आहे. श्री. किशोर बाटविया यांनी सुंदरसा कलश चित्ररूपाने साकार केला याबद्दल त्यांचे आभार आणि आता रसिका ! हा कलश आता तुला दिला तो सांभाळण्यासाठी; तूं उत्तेजन दे, आम्ही कल्पनेने डुंबू–आणि तुला रिझवू.

**श्री. कृष्णनाथ कुळकर्णी** — **श्री. पंडित य. देशपांडे**
**श्री. श्रीनिवास महाशद्बे** — **श्री. अ. द. जवळकर**

संपादन मंडळ, कवि मंडळ नासिक.

नासिक. दिनांक २८–३–७६

# –० प्रस्तावना ०–

नासिकचे कवि मंडळ आपल्या बहुमोल कार्यांमुळें परिचित आहे. आजचे युग सहकार्याचे आहे. ही गोष्ट ध्यानांत घेऊन कवि मंडळींनी पांचवा काव्य संग्रह रसिकांना सादर केला आहे. संग्रहातील बहुतेक कवि नवोदित असल्यामुळे वृत्त दोष किंवा अचूक शद्वांचा अभाव त्यामध्यें आढळेल तरीसुद्धा त्यांची धडपड लक्षात घेऊन वृत्तपत्रें त्यांचे स्वागत करतील अशीं अपेक्षा करतो.

श्री. ग. म. अंधृटकरांनी "माझे कल्पनेचे इमले" कवितेत आपल्या रित्या मनाचे इमले गगनाला भिडविले आहेत. "सूर्यफूल" छोटया कवितेतून भारतातील विविधतेचे दर्शन श्री. प्र. चिं. काळे यांनी घडविले आहे. "चंद्रावरती चालले" भावगीत शद्व आणि कल्पना या दृष्टीने उल्लेखनीय आहे. श्री. पडित य. देशपांडे यांनी कवितेत प्रेम ज्योतीचे महत्व वर्णन केले आहे. श्री. श्रीनिवास महाशद्वे यांच्या "स्वप्नचि हे माझे परि" कवितेत धुंद प्रीतीचे दर्शन घडते. श्री. अ. द. जवळकरांनी मन पांखराच्या अल्लड लीला वर्णन केल्या. दुष्टांच्या नाशास रामराज्य हवे अशी मागणी श्रीमती इंदिरा बापट यांनी केली आहे. श्री. प्रकाश अधृटकरांनी आधे अधुरेपणातील लज्जत वर्णन केली. श्री. रा. गो. पांडे यांनी ममतेच्या माहेरांतून खेडयांतील जीवनाचे यथार्थ दर्शन घडविले आहे. श्री. माधव बा. जोशीनी जीवनाचा मागोवा घेतला. सौ. शुभा भालचंद्र देशपांडे यांनी लागत नाही सूरमध्ये मनोव्यथा व्यक्त केली आहे. श्री. कृष्णनाथ कुळकर्णीनीं कविता प्रगट कशी होते ते सांगितले आहे. श्री जगदीश लक्ष्मण भोज यांनी भग्न जीवनाचे चित्र चाहूलमध्ये रेखाटले आहे.

श्री. विजयकुमार जोशींनी "कां"? कवितेत दुर्गूणी माणसांना मिळणांऱ्या मानसन्मानावर टीका केली आहे. "थांबला तो संपला" कवितेतून श्री. रमणलाल सुराणांनी गतिमान होण्याचा संदेश दिला. श्री. घनःशाम गायधनींनी "कविता" नांवाच्या कवितेतून काव्य जन्माची दर्दभरी कहाणी वर्णन केली आहे. "अधिकार" कवितेत श्रीं. सुभाष गं. खरोटे यांनी सामाजिक दोषावर टीका केली आहे. श्री. संजय देशमुखांचे "भंगलेले स्वप्न" विचारांना चालना देणारे आहे. श्री. एस. एस. बडकस यांची "जीवन" कविता उल्लेखनीय आहे. अशा आहेत काहीं कविता. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातून स्फुरलेल्या.

कवि मित्रांनी जुन्या आणि नव्या कवींचा सखोल अभ्यास करावा म्हणजे त्यांचे भवितव्य उज्ज्वल होईल !!!.

**– योगेश्वर अभ्यंकर**



# कृतज्ञतेचे दोन शब्द !!!

कवि मंडळाच्या अकरावा वर्धापन दिनानिमित्त "काव्य - कलश" हा अनोखा ५ वा काव्यसंग्रह रसिकांच्या हाती देतांना खूप आनंद होत आहे. कवि मंडळाची स्थापना करतांना मनांत आकारलेल्या संस्थेची कावळ्याच्या छत्रींसारखी तर अवस्था होणार नाही ना ? अशी भीती वाटत होती.

संस्थेच्या दृष्टीने विचार केला तर, कवि मंडळाने आकराव्या वर्षात पदार्पण करणें म्हणजे फार मोठी गोष्ट नाही. आज अनेक संस्था आपापले रौप्य, सुवर्ण, हिरक महोत्सव साजरे करताहेत. कवि मडळही असेच महोत्सव साजरे करील अशी स्वप्ने मी पहात आहे. कारण कवि मंडळाचे स्थापनेपासून अनेक प्रथितयश साहित्यिकांचे विशेषत: कवि श्रेष्ठ श्री. कुसुमाग्रज, श्री. वि. मा. दि. पटवर्धन, श्री. योगेश्वर अभ्यंकर, श्री. आण्णासाहेब अकोलकर यांचे अमोल मार्गदर्शन लाभले आहे. तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कविवर्य यशवत, श्री मंगेश पाडगांवकर, ग. दि माडगूळकर वंदना विटनकर, शांता शेळके, ललिता बापट, म. पा. भावे नारायण सुर्वे इत्यादि नामवंतांनी कवि मंडळास भेटी देऊन कवि मंडळाच्या निरनिराळ्या उपक्रमांची प्रशंसा केला आहे.

त्याच प्रमाणे नवोदित कवि कवित्रियीचे सहकार्य मिळालेले आहे. विशेषत: श्री. पं. गो सोनवणी, पदमाकर कांबळे

नरेश महाजन, बा. मा जोशी, श्री कृष्णनाथ कुलकर्णी या सर्वांच्या सहकार्यानें व मेहनतीनेच कवि मंडळ ११ व्या वर्षात पदार्पन करीत आहे. या व्यक्ती कवि मंडळ रुप झाल्या आहेत याचा मोठा अभिमान कवि मंडळास आहे.

कवि मंडळाचा काव्य कलश या अनोख्या पांचव्या काव्य संग्रहासाठी संपादक मंडळातील सर्व सदस्यांनी सहकार्य केले त्यातल्या त्यात श्रीनिवास महाशब्दे यांनी सुरवातीपासून या कामाकडे लक्ष घातले श्री. कृष्णनाथ कुलकर्णी यांनी आपल्या प्रकृतीकडे लक्ष न देताही मेहनत घेतली नव्हे त्यांचे सहकार्य नसते तर आज काव्य संग्रह प्रकाशित झाला असता की नाही याची शंकाच होती तेव्हा वरील सर्व ज्ञात व अज्ञात कवि मंडळ हितचिंतकाबद्दल मी येथे कृतज्ञता व्यक्त करतो व सर्वांचे ह्या पुढेही सहकार्य मिळेल अशी आशा बाळगतो.

जयहिंद

आपला,

**ग. म. अंधृटकर**

सस्थापक व प्रकाशक

कवि मंडळ, नासिक.

# शब्द दे –

शब्द दे असे
मागे हटणार नाही

शब्द दे असे
ऋण ते फिटणार नाही

शब्द दे असे
अंधार चंद्र व्हावा

शब्दात जीव माझा
उमलुनी उधळुनी द्यावा !

– कृष्णनाथ कुळकर्णी
नासिक.

# सूर्य फूल !

एक देठी
अनेक पाकळ्या
प्रत्येक पाकळी
पूर्ण फूल
माझा भारत
सूर्य फूल !

# सायंकाळ !

निरामय सायंकाळी
उमलतीं भाव कळ्या
बघुनिया चंद्रकोर
डुलतात गंध वेड्या
रंगछटा विसावती
काळोखाच्या पंखाखाली
उमलतीं कळीं कळी
अर्धस्फुट आज झाली !

– **प्रभाकर चिंतामण काळे**
ए. ए., बी. एड.
चिंचोली, यावल (जळगांव)

# चंद्रावरती चालले !

मी चालले मी चालले चंद्रावरती चालले ॥धृ॥
चंद्राच्या या कोमल किरणावरती बसूनी चालले !!

चंद्रावरती ताई आई
भिती मजला कसली नाही
स्वप्नात मी ग दंगले ॥१॥

चंद्रावरती फुलल्या वेली
सौख्य नांदो भवताली
प्रेमात मी ग गुंगले ॥२॥

आजवरीच्या आनंदाने
फुलली सारा सुंदर स्वप्ने
तालत मी ग नाचले ॥३॥

प्रेमाच्या या जीवन ज्योती
मांगल्याने फुलुनि जाती
सौख्यात मी ग हांसले ॥४॥

– **पंडित य. देशपांडे**
नासिक.

# स्वप्नचि हे परि ....

सत्यात आली तूं प्रीये, स्वप्न तर हे भासे मला
स्मित हास्याच्या डहाळीवर झुलती, कळी वाटते तूंच मला !!

जीवनी या अलगद येशी
मन्मनीचे बंध खुलविशी
फुलता झुलता मन हे अपुले
तूं मी पण गे तूंच विसरशी

दुरावा तो असा तुझा कां, मृगजळाचा आगळा
स्मित हास्याच्या डहाळीवर झुलती, कळी वाटते तूंच मला ।।२।।

तब भावना तव स्मृतींचे
रंग खुलता खुलते हे मन
दूरतेतुन कसे कथावे
तुझेच सारे हे तन्मन्

येशि क्षणभर वियोग खरोखर, सांगे उन्हसावलीतला
स्मित हास्याच्या डहाळीवर झुलती, कळी वाटते तूंच मला ।।१।।

– **श्रीनिवास ज. महाशब्दे**
नासिक.

# मन पांखरु !

चांदण्यात चंद्रकोर, मोहतसे मनमोर
गर्द निळ्या सावलीत उडतसे तो चकोर ॥धृ॥

स्वप्नांची ती भरारी, भिरभिरुनी जाई वरी
फिरफिरुनी येई परी, बैसे हृदय वेली वरी ॥१॥

सळसळत्या माडात, फडफडती पंख परि
टिपूर टिपूर चांदण्यात उडत राही दुरवरी ॥२॥

वलय वलय वर्तुळांत, तरत तरत तरंगात
सागराच्या लाटांवरी, फिरत राही दूरवरी ॥३॥

किरणांच्या कुंतलात, घन घन घन बरसतसे
गर्द निळ्या सावलीत, शुभ्र शुभ्र बनत असे ॥४॥

– अ. द. जवळकर
नासिक.

# पाहिजे रामराज्य आम्हां !

पाहिजे रामराज्य आम्हां
सीता त्यागाविना हवे ते
रामराज्य आम्हां.... ॥ धृ ॥

जरी मागणी भारतीयांची
रामराज्य व्हावे
चौदा वर्षे वनवासाविना
रामराज्य आम्हा
पाहिजे रामराज्य आम्हां ॥ १ ॥

सुतविरहाने मृत्यू पित्याचा
माता त्या विधवा
प्रजाही दुःखी असे नको ते
रामराज्य आम्हां
पाहिजे रामराज्य आम्हां ॥ २ ॥

धर्मपत्नीला छळुनि लावि जो
बोल महात्म्याला
ऐशा रजकाविना हवे ते
रामराज्य आम्हां
पाहिजे रामराज्य आम्हां ॥ ३ ॥

कुटिल मंथरा राणी कैकयी
ऐशा युवतीविना
दुष्टांच्या नाशास हवे ते
रामराज्या आम्हां
पाहिजे रामराज्य आम्हां ॥ ४ ॥

– **इन्दीरा बापट** नासिक.

# आधे अधुरे !

समोर असतांना माझ्या तूं
सप्त सुरांना येते जाग
धुंद गीत गाणार मी
तुझ्याचसाठी एकान्तात !

नाही म्हणू नको कधीं
गीत अर्धेच राहून जाईल
दोन अधरांची कोमल आस
विरहामुळे सुकून जाईल !

अशांत सागरी जीवन नौका
पुनश्च वादळ मिठीत जाईल
वसंत चांदण्यात अर्ध्या रात्री
गीत प्रीतीचे अधुरे राहील !!

– **प्रकाश ग. अंधृटकर**
विरार.

# ममतेच माहेर

गांवात शिरता दिसतो गांवचा पारं
चित्तवृति उफाळती, मन उल्हसते फारं ।

पारावर पिंपळाचे, झाडं एक थोरं
शेकडो तयाला शाखा, विस्तीर्ण असेही खोडं ।

पाराच्याच शेजारी, आहे एक पाणवठं
म्हणूनी गांवगुंडांची, पारावर सदा बैठकं ।

दुपारच्या प्रहरी चाले, पारावर वर्दळ
मांडती कुणी पत्ता डाव, कुणी खेळे चौसरं ।

लेक जाता सासुरी, फिरुनि पाहे पारासी
गतस्मृती जिवनाच्या, दाटुनि येति उराशी ।

साऱ्या गांवचे "पारं" एकच "सार"
श्रद्धा विश्वासाचं नि "ममतेचे माहेर" ॥

**– राम गोपाळ पांडे**
नान्दुरा (विदर्भ)

# जीवन .....

जीवन म्हणजे "जीवन" आहे । "जीवना"परी वहात राहे ।
सुख दु:खाचे रहाट गाडे । चक्रापरीं ते फिरतचि राहे ॥१॥

दरीं डोंगरीं कडे कपारी । पुढे पुढे तो जातच राही ।
'जन्म-मृत्यू' या मधील अंतर । असाच चाले ओघ निरंतर ॥२॥

भले बुरे ते अनुभव येती । दया क्षमा अन् माणुसकी ती ।
ज्यातचि होते मानव-क्रांती । त्यासी जीवन ऐसे म्हणती ॥३॥

जीवन म्हणजे कुंभ जलाचा । सतत झिरपणे त्याचे काम ।
चंदनापरी देह झिजविणे । यासी जीवन ऐसे नाम ॥४॥

– **माधव बा. जोशी**
नासिक.

# माझे कल्पनेचे इमले !

माझे रितेमन रची, कल्पनेचे इमले
इतके उंचउंच की ते गगनाला भिडे ॥ धृ ॥

ग्रहनक्षत्रांची शेज, विद्युल्लतेचे तेज
गगनाची छाया, चद्राची माया
ढगांचा आडोसा तारकांचा पसा ।
दोन्ही करांत घेऊन उधळावे जिकडे तिकडे ॥ धृ ॥

स्नेहाचा ओलावा मिळावा, सहानुभूतीचा आधार असावा ।
कृती अशी करुनी ठेवावी की स्मृती साऱ्या जगाने करावी ।
लक्ष्मीने पाणी भरावे, विद्येने मनी झुरावे ।
जनतेने शिरी घ्यावे, नाचावे, गावे, जयघोष करावे चोहिकडे ॥ध॥

आप्त जनांनी मान ठेवावा, मित्रांना जीव लावावा ।
पुत्रपौत्रिकांत व्हावे सान, जग व्हावे मज परीस लहान ।
रवीचंद्रापेक्षा ही महान, धृवासम अढळ मिळावे आसन ।
धरतीने पहावे सतत मजकडे, इतके उंचउंचकी ते गगनाला भिडे ॥
माझे रितेमन ..........

– ग. म. अंधृटकर
कविदास
नासिक.

# चाहूल !

आता झडलीं पाने
आणि झडली सारीं फुलें
निसर्ग लेण्यांचा
ओसरला आता पूर ....

निश्चल परि उभे
काटकुळी झाडे
मग्न परि संत
मनी ना खंत

भटक्या वाऱ्याचीं
पाऊले गार
पडल्या पानांवर
होतेयं सळसळ ....

इथून तिथून सळसळते
मुक्या मनाची मुकी कळ ....
पण काळाच्या पाऊलांना
येईल आगळे बळ
आणि आणीन तीच
वसन्तातली रम्य सळसळ.

– **जगदीश लक्ष्मण भोज**
भगूर.

# कां ?

कष्टकरी जीवा कां
कष्टदायी वाट
तृषार्तास मिळे
कां मृगजळ साथ ।

जन्मजात कलेला
आभाल फाटके
स्वैर चांदण्यांना
छत्र ते कां नेटके ।

पेटत्या मशालीला
तेजोमय पाप
पुण्याच्या घराला
कां अंधाराचा शाप ।

गर्वाच्या भितींना
सोनेरी कडा
नम्रतेच्या अंगणी
कां कृतघ्नतेचा सडा ।

कां सूर्याच्या दारात
आवस लोळते
सत्य असत्याचे
कोडे ना सुटते ।।

– **विजयकुमार बा. जोशी**
नासिकरोड.

# थांबला तो संपला !

चाक फिरे गरगरा गतीं येतसे सरसरा
शद्ब त्यातला हाच खरा चालला तोचि बरा ।

कालचक्र हे चाले पुढे कुणास्तव कां थांबले
जे गेले पुढे पुढे ठरले तेचि हो भले ।

चालत रहा तू सदा चालण्यात तर खरी मजा
विसावा ना घे क्षणभरी तीच जीवनाची हो सजा ।

चाक फिरे गरगरा गती येतसे सरसरा
शद्ब त्यातला हाच खरा चालला तोचि बरा ।।

– रमणलाल सुराणा
एम्. ए., बी. एड्.
पिंपळगांव ( बसवत )

# वेड्यांचा न्याय !

तूं वेडा मी वेडा ते वेडे आपण सगळे वेड्यांचे वेडे
केली वेडयाने वेडी पसन्त, प्रेम केले दोघांनी
जन्मला तिसरा वेडा, दोघांच्या मिलनानी
झाला मोठा वेडा, सगळ्या परिक्षा पास
वेडा मेला वेड्यांनीच नेले, त्याला वैकुंठास
समजले सगळे जायचे, आम्हा ह्याच मार्गाने
बसला वेडा आकाशातच, कठपुतलीच्या नाचाने
विचारतो आत्म्याला काय केले तुम्ही तेथे जाऊन ।
वेडे सांगती केले प्रेम मीच स्वतःहून
"तो" म्हणे "वेडाच वेडा" न्याय खरा हाच
आत्म्याशी केले प्रेम सांग स्वतःहून

– किशोर बाटविया

# पण कविता माझी दगावली आहे !

आज फार वाटत होते
लिहावी एक कविता
पण केवळ क्षण जात होते
सुचण्या करिता ।

एकाद्या बाल विधवेसारखे
मन होते बेचैन
म्हणून तर पेन्सील कागद
तयार होते रात्रंदिन ।

सारे करुन कळले जेंव्हा
कविता करणे सोपे नाही
आता ऑपरेशन् केल्याविना
प्रसव वेदना थांबणे नाही ।

आता मात्र ऑपरेशन्
अर्धेच यशदायी झाले आहे
मी तर वाचलो.......
पण कविता माझी – दगावली आहे ।।

**घनःशाम गायधनी**
बी. ई (यांत्रिक)
नासिक.

# गम्मत टॉप

एकदा खूपच गम्मत झाली
हत्ती घोडे नाचू लागली
पोपट मैना हसूं लागली
नेसून बसली रंगीत लुगडी
खेळू लागली झिम्मा फुगडी
मुंगीला पण कळेना
चिंगीला पण समजेना
आईला सांगितली हि
गम्मत टॉप —
आईने मारली पाठीवर थाप
चिंगी म्हणाली बापरे बाप.

– वसन्त वणीकर
नासिक.

# स्वप्न ! ! !

स्वप्न तूं होतीस माझे, स्वप्नच ठरली अखेरीं
मज सोडूनी गेलीस कां एकटीच गे दुरी
तुज वाचोनी नव्हती मजला दुजी कुठली आशा
परी दैवची माझे उलटे तूं केली माझी निराशा ॥१॥
तुज वाचोनी मुश्कील सारे तुज वाचोनी शून्यची सारे
तुज पुढती निष्प्रभ भासे मज गगनीचे तारे
मम जीवन एक पर्णकुटी तूं त्यातींल होतीस पणती
आले एक असे तुफान अन् विझली त्यातील ज्योती ॥२॥
दाटला अंधार चोहीकडे मार्ग मला दिसेना
तूं आंधळयाची होतीस काठी परी आता गवसेना
बापाहूनी होता बाप काका गे तुझा मोठा
त्याचाही ठरविला कां तूं ताई पैसा खोटा ॥३॥
आक्रोश तुझा हा कानी येतो कां सांग गे ताई
तुजसाठी रडते आहे ही आक्रंदुनी गे आई
निरोप तुझा गे कळता, हा धावत आला नाना
तो आर्त पाहतो तुजशी तूं त्याशी बोलेना ॥४॥
तुजसाठीं तुझ्या आजीने देहाची केली काठी
कां तिच्या नशीबी होते, पहाणे गे तुझी ताटी
होतीस कन्या तू माझी परी मानली मी पुत्रा ठायी
जरी पुत्र नव्हता गे मजला तरी खंत मानली नाही ॥५॥
कुणी म्हणे जगाची रीती जीव जन्मा येती न जाती
परि विसरु कसा तुज भारती तूं पोटची पोर होती ॥६॥

– दत्तात्रय शंकरराव कुऱ्हे, नासिक.

# चातकाचे स्वप्न !

चदेरी कल्पतरुवर होता नील चातक
होते मिलनाचे स्वप्न तयाचे एक ।

प्रतिक्षा करतो मारतो गे हाक
दे साजरा मला भेट तरी एक ।

पथी संकटे येऊ दे कैक
विहार करित ये पंखासवे एक ।

तृष्णा लागली मधुमिलनाची ओढ
कशीं ग निद्रा लागली तुला गाढ ।

प्रीतीकर तुझा तुझीच वाट पहातो
आंबराईतहि गे मी विरहाने झुरतो ।

तरी तूं येशील या आशेवर जगतो
पण विरह काल हा असाच लोटतो ।

आणि मेघांचा पहिला थेंब चोंचीत
येण्या अगोदर स्वप्नील दुनियेत जागतो ॥

– अरुण जगताप

# अधिकार !

दृष्टी टाकता तया तनुवर
दिसती जीर्ण वस्त्र अंगावर
देऊ न शकता वस्त्र तयाला
काय हसण्यांचा अधिकार आम्हाला ।

रस्त्याने हा एक भिकारी
क्षुधा तृषेने व्याकुर जर्जरी
हेटाळणीने दूर सारुनी
काय हसण्यांचा अधिकार आम्हा ।

माथेफिरु ते रस्त्यावर किती
कितीक त्यांना दगड मारीती
सांत्वनाचा शद्ध ही न देता
काय हसण्यांचा अधिकार आम्हा ।

दुर्भाग्यांना सौभाग्य हिनवीते
जखमेवरती मिठ चोळते
ऊणेपणाचे हास्य ते करते
हसण्यासाठी कां जन्म आपुला ?

– सुभाष गं. खरोटे
नासिकरोड.

# भंगलेले स्वप्न !

मी एक मानव, शूद्र आणि विराट
मलाही स्वप्ने पडतात —
मृगजळासारखी,
कधि खरी न होणारी.
साकार करायचा खूप प्रयत्न करतो
पण ......

शब्दात गुंफतांना छान वाटतात
कल्पनेचा बाग तर खूप सुखावह वाटतो
पण तीं कल्पनाच .......

मग भयाण शांतता
त्यातूनच जाग येते – जुन्या युगाच्या रात्रीतून
नव्या फुटणाऱ्या पहाटेची.
माझा पुनश्च प्रयत्न – आणि कल्पनांचे पुनश्च मृगजळ
मग .......

त्यातच पुन्हा आकार घेते माझे
भंगलेले स्वप्न
कधिही साकार न होण्यासाठी.

– संजय देशमुख

# माझा गाव !

दोधाडीच्या पैलतीरावर दिसतो माझा गाव
झुळझुळणाऱ्या पाण्यावरती दिसते त्याचे नाव !

दूर नदीच्या पात्रामध्ये शिवमंदीर ते छान
बुरुजामधली वाट दाखवी दरवाजा एक महान !

अंबा मंदीर ते बुरुजामधले उभे घंटा निनादात
"लाहोर आघाडी" प्रताप सांगे हुतात्मा तो चौकात !

रमते शान्ती उषा थबकते ऐकूनी मुल्लाबाग
सुरासुरांची धुंद भैरवी "धाव धाव रे श्रीरंग !

ऊस मळ्यांच्या झाली दाटी गाव दक्षिणेकडे
वाट उधळूनी ही खिल्लारे धावती पाटाकडे !

श्रमकऱ्यांचा गाव माझा दिस घालवी श्रमात
सायंकाळी घराप्रति येता, श्रम परिहाराने हर्ष !

अविश्रांत जिवांना श्रान्तकराया रजनी घाली शाल
करती पहारा वीजखांब हे घेत करी मशाल !

दूरुनि कोणी रात्रवेळी पाहिल माझा गाव
"नभ उतरले ताऱ्यासवे हे" म्हणेल तो हे खास !

दूर दूरते गंधीत झाले सुंदर केवडी बन
गंध वेडा वारा नेतो संदेश सुखाचा येथून !!

– मधुकर वा. निकम
दाभाडी.

# वनमाला

वनमाला हीं वनात बसलीं
पांघरुन हिरवी शाल
हिंदोळीवर झोके घेई
तृण पुष्प हे बाळ ।

रान मोगरा जाई जुई
तो मखमलीचा थाट
रानोमाळ गंध दरवळे
सुटला घमघमाट ।

लाल पिवळे गेंद झेंडुचे
ती काटी कोरांटीं
दरी खोरी बहरून गेली
झाली एकच दाटी ।

डोंगर माथी घेई लोळण
झुळझुळणारा झरा
थबकत थबकत चालणारा
गमला जणु ससा पांढरा ।।

**– शंकर खं. जगताप**
बी. ए.
हातनोरकर

# अर्पू तुला मी काय देवा !

अर्पूं तुला मी काय देवा
तूं तर असशी स्वयंभू ठेवा
दृष्य अदृष्य स्वरुपे वसशी
नच उरले कांही अर्पिण्यास !

वाटे द्यावे सुगंधि पुष्प
चंदन उटी सुवासिक भस्म
अर्पुनी तुज करावे संतुष्ट
परि न त्यात माझे उद्दिष्ट !

विश्वम्भर तू चराचर अनंत
भक्तिसि भाव तूं देव आहे
वल्गना स्वार्थ व्यर्थ मीच सर्व आहे
माझे म्हणुनि कांहीं मी तुज काय वाहे ?

अे. सं. जावळे
मालेगांव कॅप.

# जीवन !

जीवन असे हे स्वार्थापोटी
स्वार्थ न सोडी कोणी जगती
सर्वस्व सोडून स्वार्थासाठीं
शोधितो, तो सुखाची भरती !

भटकतांना विसरे सारे
मानव माणूसकीचे तारे
एक दिन परि असाच येतो
घेवूनी जातो त्याचे सारे !

चुका गणिता अगणित होता
पश्चात्तापाचे मन हे हरता
सुख पाहतो तरीही जगती !

श्रीमंतीची सुखद् स्वप्ने
रात्रंदिन हो जीव जाळणे
अधान्तरीचे तरंग उठता
वाटे सुंदर गरिबी जगणे !

गरिबी तर शापच ठरला
जीवनी मग अर्थ न उरला
फिरत्या पृथ्वीचा मध्य चांगला
मध्यजीवनी सुखबिंदू लाभला ! !

– एस. एस. बडकस
पचवटी – नासिक.

# ये परतोनी ! ये परतोनी !!

छेडीता हृदयीच्या तारा, स्वर न आले त्यातुनी
आठवांचे गंध दाटता अश्रु आले नयनातुनी ॥

रुतता हा मनात काटा - आणि दुभंगता वाटा
स्मृती मालिका अशी गुंफिता अर्थ न कळला त्यातुनी ॥१॥

सरताखेळ तरिही काहूर, कधि मनाचा सरला नाही
सोसल्या वेदनांचे शब्द कुणीही ऐकले नाही ॥२॥

आठवतो मीं प्रिये तुला गे येशिल कां तूं परतुनी
शपथ प्रितिची प्रिये तुला गे, ये एकदाच तूं स्वप्नातुनी ॥३॥

नकोस अव्हेरू प्रिये मला तूं, कां येऊ मी पैलतीरी ?
प्रिये ऽऽऽऽ प्रियेऽ ये परतोनी ये परतोनीऽऽ
छेडीता हृदयिच्या तारा ॥४॥

– कैलास वसंत कुलकर्णी
रावळगांव.

# तीन प्रहरी !

चालत आहे मी चालत आहे
जीवन रम्य बनवित आहे ।

पहाट झाली आशा फुलवित
चालत होतो फुले तुडवित ।

शिशुपण किती हे आल्हाददायक
स्मृतीपटलावर ठरते बोधक ।

दुपार जांभळी कधी सावळी
फुलात आली सुखवीत भोळी ।

दिन मिजाशी सारे आले
आनंदाने हसले खिळले ।

संध्या नटुनी लाजत आली
प्रीयतमेसव अधिक ठसली ।

रात्र सांगते खंत कशाला
पहाट आणील किरणांचा झेला ।

रंग तरंगी हे जीवन चाले
सारे येतील माझ्या मागे ॥

– आर. डी. भोसले
मालेगांव.

# दिला मी हाती हात !

दिला मी हाती हात
जन्माची संगत म्हणून
स्वच्छ निळ्या जलाशयात
मिलन क्षितीज पहावे म्हणून ।

दिला मी हाती हात
सुखात गुंफावी फुले
त्याच फुलांची माला आता
तुझ्या नि माझ्या गळ्यात खुले ।

दिला मी हाती हात
अंधारातहि तुझी साथ
प्रकाशल्या घरातहि
चांदण्याची लावू वात ।

दिला मी हाती हात
कणखर तुझ्या धैर्यासाठीं
जन्मोजन्मी तुझीया नांवे
माझीं भरत राहो ओटी ॥

– सौ. विशाखा म. निकम
दाभाडी.

# लागत नाही सूर !

शून्य मनाने बसले असता
स्वर न जुळती या एकान्ता
वाढतसे हुरहुर
सख्या रे लागत नाही सूर ॥

सोडूनी जाशीं तूं, सांज प्रहरी
लक्ष तारका, असुनी अंबरी
अंधार गमे बेनूर ।।१।।

विकल मनाचे, शद्व अधुरे
तुझी दूरता, जीवघेणी वाढे
खंत तयाची, तुला न कांरे
झालासे दूर दूर ।।२।।

आठवांची वींणा छेडूनी
ताल स्वर मग, येती जुळुनी
वाटे यावे, पुन्हां परतुनी
भरुनी येता ऊर –
सख्या रे लागत नाही सूर ।।३।।

– सौ. शुभा भालचंद्र देशपांडे
नासिक.

# सर सर – झर झर – झरता ओळी –

सर सर झर झर झरता ओळी
प्रगटे कविता तिथे सावळीं ।

गंध फुलांचे रंग नभाचे
स्वागत करिती या कवितेचे ।

हात कटीवर कधि दिठीवर
रुणझुण करिती कवितेचे रव ।

गहिवरतांना ओळी ओळी
होवूनी येते राधा भोळी ।

दवबिंदू वर घेत विसावा
घुमवित बसते मंजुळ पावा ।

घन सावळे बरस बरसता
कविता झाली जीवन गीता ॥

– कृष्णनाथ कुळकर्णी
२३७५ बुधवार पेठ, नासिक.